INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# "मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार" कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षण संस्थांच्याभूमिकेचे महत्व

## (Importance of the role of Educational Institutions for the effective implementation of the Right to Free and Compulsory Education Act)

**जगदीश भिकनराव सूर्यवंशी**
प्राचार्य,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
सायगव्हाण, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/02.2025-65199611/IRJHIS2501009

**प्रस्तावना :**

संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या घोषणेमध्येबालकांच्या जन्मजात हक्कांची घोषणा करणारा जाहीरनामा सन 1959 मध्ये मंजूर झाला. त्यात संरक्षण, शिक्षण, आरोग्य, निवारा आणि चांगले पोषण या बालकांच्या हक्कांचा समावेश होता. संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीने 1990 या वर्षी न्यूयार्क येथे मुलांसाठी पहिली जागतिक शिखर परिषद झाली युनिसेफने आयोजित केलेल्या या शिखर परिषदेत मुलांच्या हक्कांसाठी रॅली काढण्यात आली. त्यात मुलांच्या जगण्याची, संरक्षणाची आणि विकासाची घोषणा त्यावेळी करण्यात आली. जागतिक संघटनेने आयोजित केलेल्या अधिवेशनात निश्चित केलेल्या धोरणानुसार18 वर्ष वयोगटापर्यंतची प्रत्येक व्यक्ती बालक म्हणून ओळखली जाते.

शारीरिक व मानसिक अपरिपक्वतेमुळे बालकाची अधिक काळजी घेऊन संगोपन करावे लागते, कायद्याने संरक्षण दयावे लागते. अशाप्रकारे बालकाची योग्य ती काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यांना शिक्षण, चांगले आरोग्य, पाणी, पोषक अन्न आणि कायद्यान्वयेसंरक्षण प्रदान करण्याची आवश्यकता असते. संयुक्त राष्ट्र संघाच्या बाल हक्क समितीने एकूण ५४ कलमे आणि प्रमुख हक्क सुचविले आहेत त्यांपैकी काहींचा विचार पुढीलप्रमाणे केला आहे (१) जगण्याचा हक्क(२) सहभागाचा हक्क(३) संरक्षणाचा हक्क आणि (४) विकासाचा हक्क.

बालकांना त्यांचे सर्व अधिकार मिळावेत, यासाठी पुढाकार घेऊन वंचित, पीडित, शोषित, दुर्बल वर्गातील बालकांसाठी विशेष उपाययोजना कराव्या लागतील. सर्व बालकांना समान संधी उपलब्ध करताना कोणत्याही रूढी, परंपरा, सांस्कृतिक अथवा धार्मिक प्रथा बालकाच्या हक्काच्या आड येणार नाहीत किंवा अडथळे निर्माण करणार नाहीत याची दक्षता घ्यावी लागेल.बालकाच्या हक्कांचा विचार करताना सर्व बालहक्कांबाबत विचार करून समान संधीची खात्री देणे हे सर्वांचे कर्तव्य आहे वय, लिंग, वंश, जात. भाषा, धर्म, मानसिक व

शारीरिक आजार किंवा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती अशा कोणत्याही गोष्टीच्या आधारे बालकांमध्ये भेदभाव करता येणार नाही याची खबरदारी घ्यावी.

शिक्षण हे माणसाच्या जन्मापासूनच सुरू होते त्याची सुरुवात निरीक्षणातून होत असते निरीक्षण, जिज्ञासा, आकलन, समस्यानिराकरण आणि उपयोजन या मार्गाने ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया घडत असते आणि यालाच ज्ञाननिर्मितीचे सोपान असेदेखील म्हटले जाते. प्रत्येक मूल हे स्वतः ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करत असते; परंतु या शिकण्याच्या प्रक्रियेत बालकाने स्वतः शोध घेणे, अनेक वस्तू व साधने यांची हाताळणी करणे, समवयस्क / सहकारी यांच्यासोबत आंतरक्रिया करणे, समाजातील प्रौढ व्यक्ती व पालक यांच्यासोबत आंतरक्रिया करणे, भोवताली घडणाऱ्या घटना, तसेच अनुभवांचे विश्लेषण करून अनुमान काढणे, हे अपेक्षित असते.विनोबा भावे म्हणूनच म्हणतात, "मुलांचेजगणे शिकण्यात आणि शिकणे जगण्यात यायलाहवे."

बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी मोफत प्राथमिक व माध्यमिक शिक्षण तणाव विरहित आनंददायी शिक्षण देत असताना बालकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या गरजा पूर्ण करू शकेल, असे शिक्षण प्राप्त करून देणे गरजेचे आहे. मुक्त समाजजीवनात बालक एक कार्यक्षम नागरिक बनू शकेल असे शिक्षण देताना त्याच्या आवडी-निवडी, खेळ, विविध स्पर्धा, सादरीकरण, संधी, सांस्कृतिक कलात्मक कार्यक्रमातील सहभागाची संधी सर्व बालकांना उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे विशेष काळजीची आवश्यकता असणारी मुले यात दिव्यांग, स्वमग्न, लाजाळू, अत्याचारित, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली, सुधारगृहातून, अनाथालयातून आलेल्या अशा सर्वच बालकांना सांस्कृतिक कलात्मक कार्यक्रमात भाग घेण्याची संधी नाकारता येणार नाही तसेच बालकाला सांस्कृतिक जीवन आणि कला याचा उपभोग घेण्याची संधी देणे हा त्याचा हक्क दिला पाहिजे.या सर्व बाबींचा विचार करून केंद्र सरकारने सन 2002 च्या 86 व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद 21 (ओ) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right of children to Free and Compulsory Education Act, 2009 (No. 35, 2009), केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या 27.08.2009 च्या राजपत्रात प्रसिद्ध केला आहे. तसेच, भारत सरकारच्या दिनांक १६.२.२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक 01.04.2010 पासून संपूर्ण भारतात(जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला असल्याचे नमूद केले आहे

समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये, सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जावू शकतात, यादृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरवविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनावर आली आहे.

केंद्र शासनाने पारित केलेला कायदा राज्यात लागू झाला असल्यामुळे त्या कायद्यातील सर्व तरतुदींचे पालन करण्याच्यादृष्टीने शैक्षणिक संस्था, शाळा, मुख्याध्यापक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास हा अधिनियम आणून देण्यात यावा असे नमूद केले आहे.मुलाच्या शिक्षणात ज्याप्रमाणे शाळेची प्रमुख भूमिका असते, त्याचप्रमाणे घरी कुटुंबाची / पालकांची भूमिकादेखील महत्त्वाची ठरते आर.टी.ई. ने जसा प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार दिला, तसेच पालकांनादेखील बालकाचे शिक्षण सुनिश्चित करण्यास जबाबदार धरले आहे म्हणूनच शिक्षणात पालकांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची ठरतेअसे म्हणतात, 'मुलाचे पहिले शिक्षक म्हणजे त्याचे पालक असतात. प्रेम, मार्गदर्शन, भाषा, संप्रेषण, जीवनकौशल्य, मानसिक व भावनिक कौशल्य रुजवण्याचे व आधार देण्याचे काम पालक करतात. मुलांच्या

शिक्षणाचा पाया रचण्याचा मार्ग सुकर होतो. शाळांमध्ये आज विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व देऊन, त्याप्रमाणे अध्ययन अध्यापन प्रक्रिया राबवली जाते. कृतियुक्त शिक्षणात विविध प्रयोग, क्षेत्रभेट, खेळ, कला, सहल, पर्यावरण शिक्षण, सर्जनात्मक लेखन, श्रमसंस्कृती, साहित्याच्या हाताळणीतून संकल्पना निर्मिती, तसेच स्वतः कृतिशील राहून शिकणे, ज्ञानरचनावादी अध्ययन-अध्यापन प्रक्रिया राबविणे याला महत्त्व दिले जाते. या रचनावादी शिक्षण प्रक्रियेत देखील पालक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात पाठ्यपुस्तकांवर अवलंबून न राहता आपण असे करून पाहू असेही होऊ शकते! असे का घडते? चला हे शोधू या. अशांसारखे छोटे उपक्रम, प्रकल्प, खेळ, विविध कृती, साहित्य वापरून घरीच पालक मुलांचे शिकणे सोपे आणि आनंददायी करू शकतात. पालकांच्या सहभागाने मुलांच्या अध्ययनावर सकारात्मक प्रभाव पडतो. जागरूक पालक खुला संवाद आणि मजबूत बंध निर्माण करण्यासाठी मुलांसोबत गुणात्मक वेळ घालवून त्यांच्या अध्ययनात मदत करू शकतात म्हणून पालकांच्याहीनिदर्शनास हा अधिनियम आणून देण्यात यावा असे नमूद केले आहे

अधिनियमातील कलम ६ नुसार तीन वर्षाच्या आत स्थानिक प्राधिकरण यांनी आपल्या परिसरात शाळा उभारायची आहे. स्थानिक प्राधिकरण यात जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिका यांचा सामावेश होतो परंतु महाराष्ट्र राज्यात बहुतांशशाळा या संस्थेच्या असुन सदर कायद्याचीप्रभावीपणे अंमलबजावणी करायाची जबाबदारी जरी शासनाची असली तरी ती प्रत्यक्षात मात्र शैक्षणीक संस्थांवर आलेली आहे त्यानुसार संस्थांनीत्यांच्या परिसरातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरवावे. राष्ट्रीय नियमाप्रमाणे परिसराची संकल्पना धरली गेली तर दर १ कि. मी. च्या आत प्राथमिक शाळा (इ.१ते ४ साठी) दर तीन किलोमीटरच्या आत उच्च प्राथमिक शाळा (इ. ५ते ७ साठी) असणे आवश्यक आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या अहवालाप्रमाणे आज भारतातील ८७% वाडया/वस्त्या/प्रभाग यांच्या परिसरात प्राथमिक शाळा तर ७८ % परिसरात उच्च प्राथमिक शाळा आहेत. अजून १,४०,००० शाळांची आवश्यकता देशामध्ये आहे. देशातील प्रत्येक वाडी वस्तीच्या जवळ प्राथमिक/ उच्च प्राथमिक शाळा देण्याचे शासनासमोर आर्थिक आव्हान तर आहेच पण या शाळांमधे शिक्षक, पायाभूत सुविधाहीपुरवाव्या लागणार आहेत. शिवाय यापैकी बहुतांश शाळा या दुर्गम, डोंगराळ प्रदेशात उघडाव्या लागतील. अशा शाळांमधे शिकवण्यासाठी मिळणारा शिक्षक दुर्मिळच त्यामुळे या सर्व सुविधा फक्त शैक्षणिक संस्थाच पुरवू शकतात म्हणूनआजमितीला शासनाकडे तरी दुसरा पर्याय नाही संस्थेतील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी शासनास परिणामकारक प्रशिक्षण आराखडा तयार करावे लागतील. प्रशिक्षणामधे आनंददायी शिक्षण, कृतीयुक्त शिक्षण याबरोबरच मुले आपापल्या ज्ञानाची संरचना स्वतः कशी करतील यासाठी त्यांची संस्कृती, रहाणीमान, भाषा याला अनुभवन कसे शिकवावे याबाबतचे ठोस मार्गदर्शन द्यावे लागेल.

कलम १२ ते २८ ही शाळा व शिक्षकांच्या जबाबदारीशी संबंधित आहेत शासकीय असो की खाजगी, अनुदानित असो वा विनाअनुदानित, प्रत्येक शाळेमधे २५% जागा या दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे शाळा जर विना अनुदानित असेल तर अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी येणारा खर्च शासन या शाळांना देणार आहे. पण संशोधन सांगते की 'मोफत शिक्षण' हे सुध्दा पालकांना खर्चात टाकणारे असते. शिक्षण शुल्काव्यतिरिक्त दप्तरे, वहया, स्टेशनरी याचा खर्चही काही पालकांना परवडत नाही, मग अशा पालकांना समाजकल्याण विभागाच्या/महिला बाल विकास विभागाच्या शिष्यवृत्तीच्या योजनांचा लाभ द्यावा लागेल. या योजनांची माहिती तसेच या विभागाबरोबर समन्वय साधण्याबाबत मुख्याध्यापकांना प्रशिक्षण द्यावे लागेल शिवाय प्रश्न हा फक्त खर्चाचा नसून दुर्बल घटकातील मुलांना शाळेत आणण्याचा व शिकवण्याचा आहे. खाजगी अथवा विनाअनुदानित शाळांमधे इतर मुलांबरोबर ज्यांच्या पिढयानपिढ्या शिकलेल्या आहेत, ज्यांना तंत्रज्ञानाची साथ घरुन मिळत आहे अशी मुले व प्रथमच शाळेचं तोंड पाहिलेली घरुन शिकवण्यासाठी कोणतेही सहाय्य

नसलेली मुले एकाच वर्गात एकत्र शिकायला लागतील शिक्षकाच्या अध्यापन कौशल्याचा इथे कस लागणार आहे!

या कायद्यान्वये सहा ते चौदा वयोगटातील कोणत्याही मुलास जो कोठेही शिक्षण घेत नसेल व शाळेच्या परिसरात अशी मुलेआढळल्यास अशा शाळाबाहय मुलांना शिक्षणापासून वंचित न ठेवता शैक्षणिक संस्थाआपल्या शिक्षकांच्या माध्यमातून अशा मुलांचे सर्वेक्षण करुन घेतील तसेच अशा शाळाबाह्य मुलांनाजे मूळ कधीच शाळेत गेले नसेल अशा मुलासवयानुरूप त्या त्या वर्गात प्रवेश देऊन त्यांना नियमित अभ्यासक्रम शिकविण्यासोबतच शाळेत येण्याची बसण्याची, मानसिक व भावनिक तयारी करून घेणे अपेक्षित आहे. त्यांच्या मागील राहिलेल्या शिक्षणासाठी अतिरिक्त तासांचे नियोजन करुन सेतू वर्ग, तयारी वर्ग व उपचारात्मक वर्ग सुरु करून अशा बालकांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्याची जबाबदारी शिक्षणसंस्थांची आहेयाव्यतिरित अधिनियमाच्या कलम 13 अनुसार या वयोगटातील बालकांना कोणत्याही शैक्षणिक संस्थेस प्रवेश देतांना कोणत्याही स्वरुपात देणगी किंवा शासनाने विहित न केलेले शुल्क आकारता येत नाही त्यासोबतच प्रवेशाकरिता बालक किंवा पालकांसाठी कोणालाही चाचणी परीक्षा पध्दतीचा अवलंब करता येत नाही व परिसरातील सर्वांना प्रवेश अर्ज उपलब्ध करुन देणे शैक्षणिक संस्थांवर बंधन असते.संस्थेच्या अथवा परिसरातील प्रवेशासाठी आलेल्या सर्व प्राप्त प्रवेश अर्जांमधुन मुलांचे प्रवेश अत्यंत पारदर्शकरित्यालॉटरी पद्धतीचा अवलंब करून देण्यात यावेत अशी कायद्यात तरतुद आहे. त्याशिवाय कलम 17 नुसार बालकास शारिरीक शिक्षा व मानसिक त्रास देण्यास प्रतिबंध करण्यात आलेला असून कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देता येणार नाही. तरतुदीचे जो कोणी उल्लंघन करील अशा व्यक्तीस नियमान्वये शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल.

अधिनियमाच्या कलम 25(1) अनुसार प्रत्येक शाळेस अनुसूचीतविनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखणे अनिवार्य आहे. प्रतिवर्षी 30 सप्टेंबर रोजी शाळेत पटनोंदणी झालेल्या विद्यार्थी संख्येनुसार पदनिश्चितीकरून त्यावर आधारित मान्य शिक्षकांची पदे शिक्षण संस्थेने भरणे आवश्यक आहेत. सदर पदे भरतांना अधिनियमातील कलम 23(1) अनुसार शिक्षक प्रशिक्षित असणे अनिवार्य केलेले आहे.त्याप्रमाणे इयत्ता 1 ली ते इयत्ता 5 वी च्या वर्गांसाठी शिक्षकांची शैक्षणिक अर्हता डी.एड. अशी असणे आवश्यक आहे तसेच इयत्ता 6 वी ते इयत्ता ८ वीच्या वर्गासाठी पदवी बी.एड. अशी शैक्षणीक अर्हता असणे आवश्यक आहे.या अधिनियमान्वये एखादया शैक्षणिक वर्षात एखाद्या विद्यार्थ्यास अनुत्तीर्ण किंवा कोणत्याही कारणास्तव शाळेतून काढून टाकता येत नाहीएखादया विद्यार्थ्यांची संपादणूक असमाधानकारक असली तरी त्यास पुढील वर्गात प्रवेश देण्यात यावा असे नमुद आहे म्हणून ज्या विषयामध्ये संपादणूक असमाधानकारक आहे.त्या विद्यार्थ्यांची त्या त्या इयत्तांमध्ये अपेक्षित अध्ययन समता संपादन करीलतसेच पालकांसोबत बैठका घेऊन त्यांना त्यांच्या मुलाची अध्ययन क्षमता तसेच अध्ययनातील प्रगती याबाबत अवगत करण्याची जबाबदारी शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यायाने शाळा यांची असतेअसे कायद्यात नमूद आहे म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांची ज्या विषयाची संपादणूक पातळी सभाधानकारक नाही त्या विषयांच्या उत्तरपत्रिका अभ्यासाव्यात. त्यावरून विद्यार्थ्यांच्या संपादणूकीतील उणिवा असलेल्या घटकांची यादी करून त्यामागील कारणांचा शोध घेऊन त्याआधारे विद्यार्थ्यांच्या संपादणूकीमधील अडचणी, त्रुटी, उणिवा दूर करण्यासाठी कालबद्ध नियोजन करणे तसेच संबंधित विद्यार्थ्यांना वैयक्तिक / छोट्या गटात शाळा सुरु होण्यापूर्वी किंवा शाळा सुटल्यानंतर आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करुन प्रत्येक विद्यार्थी अपेक्षित अध्ययन क्षमता संपादित करील यासाठी शिक्षण संस्थेने सर्व संबंधित घटकांशी चर्चा करूनतसेच योग्य सहकार्य व कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

शाळेचे संनियत्रण, शाळेचा विकास आराखडा तयार करणे व अनुदानाचा विनियोग योग्य होतो की नाही, यावर नियंत्रण

ठेवण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती प्रत्येक शाळेमधे असावी असे कलम २१ मधे दूर केले आहे या समितीत ७५% पालक असावेत. सध्या ही कामे ग्राम / प्रभाग शिक्षण समिती करते. या दोन समित्यांची कार्यकक्षा स्वतंत्र का एकच याबाबत स्पष्टता राज्य शासनाला कायद्याचे नियम करताना करावी लागेल. पण प्रश्न आहे तो शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना शाळेचा विकास आराखडा कसा करावा, त्यामध्ये ध्येय, उद्दिष्टे कोणती असावीत, विकास आराखड्याचे घटक कोणते, अनुदानाचा विनियोग व शालेय व्यवहारात पारदर्शकता कशी ठेवावी, या व अशा अनेक विषयामधे प्रशिक्षणाची आवश्यकता भासणार आहे. जी गावे शैक्षणिक दृष्ट्या मागासलेली आहे त्या गावांमधे लोकांना समजेल अशा प्रकारे प्रशिक्षण देणे हे शिक्षण विभागाच्या जिल्हा स्तरावर असणाऱ्या जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थांसमोर मोठे आव्हान आहे कदाचित लोकांना प्रशिक्षणाला न बोलावता प्रशिक्षण त्यांच्या दारात न्यायला हवे यासाठी उपग्रहांद्वारा प्रशिक्षणाचाच वापर करायला लागेल. मग त्यासाठी प्रभावी असे दूरशिक्षणाचे आराखडे तयार करणेही आलेच तीही जबाबदारी नैसर्गिकरित्या शैक्षणिक संस्थांवरआहे.

या अधिनियमातील कलम 18 (1) च्या अनुसुचीमध्ये शाळेसाठी आवश्यक असलेली मानके व निकष विनिर्दिष्ट केलेली आहेत. त्यात प्रामुख्याने पायाभूत सुविधांचा विचार केल्यासशाळेत भौतिक व आरोग्य सुविधा असणे आवश्यक आहे त्यात शाळेसाठी सुसज्ज अशी पक्की इमारत, शाळेला सुंदर असे प्रवेशद्वार, विद्यार्थ्यांच्या प्रमाणात फर्निचर असलेल्या पुरेशा वर्गखोल्या, वर्गखोल्यांचा आकार विहित मर्यादित असणे त्याशिवाय वर्गखोल्यांमध्ये पुरेशी प्रकाश व्यवस्थाव खेळती हवा असणे गरजेचे आहे. तसेच सुंदर अशी रंगरंगोटीव वर्ग खोल्यांच्या भिंती बोलक्या हव्यात, इमारतीत स्वतंत्र कार्यालय, स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष, शिक्षक कक्ष, दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर, भांडार गृह किंवा गोदाम, पुरेशा प्रमाणात विज्ञान साहित्य असलेली स्वतंत्र प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांना वाचनासाठी क्रमिक पुस्तके सोडूनइतर अवांतर वाचनाची पुस्तके तसेच शिक्षकांसाठी संदर्भ ग्रंथांची पुस्तके असलेलेग्रंथालय व वाचनालय, क्रीडा खोली, विना अडथळा प्रवेश, स्वच्छ व निर्जंतुक पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, हात स्वच्छ धुण्यासाठी हँड वॉश स्टेशन, प्रथमोपचार पेटीसहीत उत्तम आरोग्य व्यवस्था, मुलामुलींसाठी वापराच्या पाण्याची पुरेशी उपलब्धता असलेले स्वतंत्र स्वच्छता गृह,शाळेच्या दैनंदिन पोषण आहार शिजविण्यासाठी आवश्यक असलेला भाजीपाला पिकविण्यासाठी शाळेची स्वताची परसबाग, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी संरक्षक भिंत, तसेच पुरेसे अध्ययन अध्यापन साहित्य, माहिती तंत्रज्ञानाच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुरेसे संगणक असलेलेसंगणक कक्ष, खेळ व क्रिडा विषयक सामग्री व इतर साहित्य, वर्तमानपत्रे व नियतकालिके,अग्निशमन यंत्रे इ. प्रकारच्या सर्व बाबी तपासल्यानंतर या कायद्यानुसार शाळांना मान्यता मिळते व दर तीन वर्षांनी मान्यतेचे नूतनीकरण करावे लागते. यापैकी एखाद्या निकषाची पूर्तता नाही झाल्यास त्या शाळेस मान्यता मिळत नाही म्हणून या सर्व साधनांची उपलब्धता करून देण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्थांवरआहे आणि संस्थांनी या सर्व मानके व निकषे यांची पुर्तता केल्यास केंद्र सरकार तसेच राज्य शासनाने केलेल्या बालकांच्या मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल.

शिक्षणाचा हक्क हा मतदानाच्या हक्कापेक्षा अत्यंत प्रभावी व सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे साधन आहे प्रत्येक मुलापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविणे ही शासनाची जबाबदारी आहे या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यकर्त्यांपासून शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक घटकाला जबाबदारीने, कार्यक्षमतेने काम करावे लागणार आहे.यासाठी शैक्षणिक संस्थांची भूमिका खूपच महत्वाची आहे.

**संदर्भ :**


१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम -२००९

२. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (यशदा पुणे)

३. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे(विद्या परिषद) यांची पुस्तके

४. चित्ते कीर्ती, शाश्वत विकासासाठी शिक्षण.

५. बोरकर गणेश, बालहक्क व कायदे: बालविकास - बालकल्याण.

६. डॉ. गटकळ रंजन, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास.